# बृहन्मुंबई महानगरपालिका

## क्रांतिवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालय

**<u>जाहिरात</u>**

क्र.अतिआयुक्त / प.उप. /डी./2301 दि. 21/10/2022 अन्वये पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय आधिकारी यांची क्रांतीवीर महात्मा ज्योतीबा फुले रुग्णालय विक्रोळी (पू) येथे खालील एकूण चार अतिरिक्त पदांसाठी इच्छुक उमेदवारांनाकडून दि. 31/10/2022 ते 09/11/2022 पर्यत अर्ज मागविण्यात येत आहे. अर्ज करण्यापूर्वी ,संबंधीत आस्थापना कर्मचारी यांचेशी साप्ताहीक सुट्टी व सार्वजनिक सुट्टी वगळून कार्यलयीन वेळेत संपर्क साधावा. एस विभागातील सी.एफ.सी. केंद्रामध्ये रु. 502/-चे चलान भरल्यानंतर विहित नमुन्यातील अर्ज ईच्छूक उमेदवारांना देण्यात येतील.

| पदनाम | अतिरिक्त आवश्यक पदे |
|---|---|
| **पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय आधिकारी (बालरोग तज्ञ)** | **02** |
| **पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय आधिकारी (ऑब्स्ट्रक व गायनॅक)** | **02** |

कंत्राटी तत्वावर पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय आधिकारी या संवर्गातील पदे भरण्याकरिता खालील प्रमाणे अर्हता प्रस्ताविण्यात येत आहेत.

### ★ <u>शैक्षणिक अर्हता</u>

1. .सदर डॉक्टरांना कंत्राटी नियुक्तीकरिता अहर्ता 'पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय अधिकारी'`(PGMO)सुधारित अर्हते प्रमाणे मान्यता प्राप्त विद्यापीठाची 'एमबीबीएस'(MBBS) पदवी व त्यानंतर संबंधित विषयातील पदव्युत्तर पदवी व पदवी (एमडी (MD) /एमएस (MS)/डी एन बी (DNB) ) प्राप्त झाल्यानंतर सुस्थापित रुग्णालयातील / चिकित्सालयातील या विर्निर्दिष्ट विषयांतर्गत कामाचा एक वर्षापेक्षा कमी नाही इतका अनुभव असावा .उपनगरीय रुग्णालयातील संबंधित विभागाची संपूर्ण जबाबदारी सदर पदांवर असल्याकारणाने तसेच बंधपत्रधारक उमेदवार ,प्रबंधक आणि

आवास अधिकारी, तसेच सी पी एस विद्यार्थी यांना मार्गदर्शन करण्याची व त्यांच्या कामकाजावर देखरेख करण्याची जबाबदारी सदर पदांवर असल्याकारणाने पदवीधर पदवी प्राप्त झाल्यानंतर कमीत कमी एक वर्षाचा अनुभव अत्यंत महत्त्वाचा आहे. यास्तव हया पदांकरिता अननुभवी बंधपत्रधारकांचा विचार करता येणार नाही.

2. उमेदवार महाराष्ट्र राज्य वैद्यकीय परिषदेकडे (MMC) नोंदणीकृत असावा .
3. सदर उमेदवारास एच एम आय एस (HMIS) संगणकीय प्रणालीमध्ये (जे उपलब्ध आहे तेथे) रुग्णांची माहिती स्वत: भरावी लागेल त्या द्रुष्टीने आवश्यक ते संगणक वापराचे कौशल्य असावे .
4. सदर उमेदवरांना मराठी भाषेचे गरजेपुरता ज्ञान आवश्यक आहे ( वाचणे , बोलणे)

## ★ <u>अटी व शर्ती</u>

1. सदर पदांकरिता उमेदवाराचे वय अर्ज करताना 58 वर्षापेक्षा अधिक असता कामा नये. तसेच वयाची 58 वर्षे पूर्ण होताच सेवा आपोआप संपुष्टात येईल.
2. सदर उमेदवारांना उपनगरीय रुग्णालयांच्या अपघात विभाग / तात्काळ सेवा विभागात चक्रांकित पध्दतीने तिनही सत्रांमध्ये रविवार/ सार्वजनिक सुट्टी च्या दिवशी (कर्तव्यावर On Call हजर)/ ओ पी डी सुट्टी मध्ये काम करावे लागेल व नियमानुसार प्रशासनाने रुग्णालय प्रमुख यांनी केलेल्या डयुटी लिस्ट प्रमाणे साप्ताहीक सुटटी मिळेल.
3. तसेच प्रशासनाने/ रुग्णालय प्रमुखांनी नेमून दिलेल्या वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी/ वैद्यकीय अधिकारी यांच्या आदेशाने काही अपवादात्मक आपत्कालीन परिस्थिती आवश्यकतेनुसार रुग्णालयातील इतर विभाग बाहयरुग्ण विभाग अंतर रुग्ण विभाग आणि अतिदक्षता विभाग येथे काम करावे लागेल.
4. सदर डॉक्टरांना रुग्णालयात काम करताना संबंधित विभागातील मार्गदर्शक तत्वे व कार्य प्रणालीचे पालन करावे लागेल तसेच संबंधित रुग्णसेवेसाठीची न्याय वैद्यकीय (Medicolegal) जबाबदारी घ्यावी लागेल.
5. सदर उमेदवारांनी रुग्ण व त्यांचे नातेवाईक व वरिष्ठ नागरिक, महापालिका वरिष्ठ कर्मचारी व महापालिका कर्मचारी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी त्यांचे कार्यकर्ते यांच्याशी सौजन्याने वागावे.
6. सदर पदावर नियुक्ती ही कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात केवळ तीन वर्षाकरीता असेल व तीन वर्षानंतर सदर नियुक्तीचे सर्व आदेश रद्द बातल समजण्यात येतील.( कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या उमेदवारांची सेवा समाप्त करण्यात येईल.)
7. सदर उमेदवारांना निव्वळ कंत्राटी पद्धतीने तीन वर्षापेक्षा जास्त नाही इतक्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती केले असल्याने महानगरपालिकेच्या कोणत्याही कायमस्वरूपातील पदावरील नियुक्ती करिता हक्क अथवा प्राधान्य मागता

येणार नाही तसेच हे महानगरपालिकेच्या कायमस्वरूपातील पदावरील लाभ मिळण्यास पात्र ठरणार नाहीत किंवा सेवेचा सेवाजेष्ठतेसाठी प्राधान्य देण्यात येणार नाही तसेच भविष्यात त्यांना पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय आधिकारी या पदावर हक्क सांगता येणार नाही.

8. सदर कंत्राटी तत्वावरील या पदावर निवडलेल्या पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय आधिकारी उमेदवारांकडून 100 रुपयांच्या बॉड पेपरवर करारनामा घेण्यात येईल (प्रतिज्ञापत्र)
9. सदर उमेदवारांसाठी निवास स्थानाची व्यवस्था केली जाणार नाही.
10. रुग्णालय प्रमुखांच्या शिफारशीने असमाधानकारक कामाकरिता किंवा इतर कोणत्याही कारणासाठी प्रमुख वैद्यकीय अधिक्षक व खाते प्रमुख (माआसे) यांच्या स्वाक्षरीने सदर उमेदवाराची सेवा कोणतीही पूर्वसूचना दिल्याशिवाय समाप्त करण्यात येईल.
11. सदर डॉक्टरांची नेमणूक प्रमुख वैद्यकीय अधीक्षक व खाते प्रमुख (मा.आ.से.) स्वाक्षरीने निव्वळ कंत्राटी पद्धतीने तात्पूर्त्या स्वरुपात करून प्रत्येक तीस दिवसांनी एक दिवस सेवा खंड देऊन तीन वर्षा करिता असेल.
12. सदर पदावरील कंत्राटी पद्धतीने निवडण्यात येणा-या उमेदवारांना ठोस मानधन रुपये 90,000/- प्रतिमाह देण्यात येईल.
13. उमेदवारांविरूध्द पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास / शिक्षा झालेली असल्यास ,उमेदवारांनी त्याबाबतचा ( NOTERISED AFFIDAVIT) प्रतीज्ञापत्रक देणें आवश्यक आहे.
14. सदर डॉक्टरांना रुग्णालयात काम करताना महापालिकेच्या नियमाचे उल्लंघन केल्यास अथवा काही आक्षेपार्ह वर्तन केल्यास तसेच संबंधित विभागातील कामकाजाबाबत अकार्यक्षमता केल्याचे निदर्शनास आल्यास अथवा रुग्णसेवेत निष्काळजीपणा केल्याचे निदर्शनास आल्यास तात्काळ कोणत्याही पूर्वसूचना न देता सेवेतून कमी करण्यात येईल.
15. सदर नियुक्ती निव्वळ कंत्राटी तत्वावर तीन वर्षाच्या कालावधीकरिता असेल त्यांना महानगरपालिका कर्मचा-यांप्रमाणे सेवेचे इतर कोणतेही फायदे अनुज्ञेय होणार नाहीत.
16. स्थानिक पातळीवर /रुग्णालयीन स्तरावर 'वैद्यकीय अधिक्षक'/'प्रमुख वैद्यकीय आधिकारी'यांच्यातर्फे'पूर्णवेळ पदव्युत्तर वैद्यकीय आधिकारी' (PGMO) रिक्त पदांकरिता इच्छुक उमेदवारांकडून आवश्यक त्या कागदपत्रांसह विहित नमुन्यात अर्ज मागविणयात येईल.

**टिप –उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेबाबतचे प्रमाणपत्र, व्यवसाययिक अर्हता, संबंधित अनुभवाचे प्रमाणपत्र , बंधपत्र पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र , इत्यादी यांच्या मुळप्रती व सांक्षाकित प्रतीसह पडताळणीसाठी रुग्णालय प्रमुखांनी दिलेल्या वेळेत उपस्थित राहावे.**